# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १०/एनजीपी/नवीन/मान्यता/२०१९/ ७०२

दिनांक : 25 JUN 2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास संचालनालयाची मान्यता देण्याबाबत.....

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०१९/(प्र.क्र.९६/१९)/तांशि-५, दिनांक : २५.०६.२०१९.

२. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक: १०/एनजीपी/नवीन/मान्यता/२०१९/६७४, दिनांक : २०.०६.२०१९.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये शासनाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

तरी, त्या अनुषंगाने आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करणे याकरीता संचालनालयाची मान्यता देण्यासाठी संचालनालयाचे संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींची पुर्तता तात्काळ करण्यात यावी. तसेच संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद अट क्रमांक १२ व १३ च्या अनुषंगाने “फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास या प्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहील” अशा आशयाचे हमीपत्र रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर सादर करावे. सदर बाबींची पुर्तता केल्यानंतरच संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद अटींच्या अधीन राहून अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संचालनालयाकडून मान्यता देण्यात येईल. तरी संबंधित संस्थांनी दिनांक २७.६.२०१९ पर्यंत आवश्यक कागदपत्रे सादर करुन संचालनालयाचे संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकासोबतच्या यादीनुसार कागदपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा, अन्यथा संबंधीत अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशाबाबत संबंधित संस्थांना काही समस्या उद्भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या विभागातील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून राज्यात व्यावसायिक औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०१९/(प्र.क्र.९६/१९) तांशि-५**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २५ जून, २०१९

**संदर्भ :** १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एनजीपी/नवीन/मान्यता/२०१९/५२४, दिनांक १७.०५.२०१९.

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून राज्यात व्यावसायिक औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्थांना मान्यता देण्यासंदर्भात दिनांक १५.०५.२०१९ रोजीचे ई-मेल द्वारे संचालक, तंत्र शिक्षण यांना प्राप्त झालेल्या यादीच्या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी संदर्भीय पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** मधील नमूद **०२** संस्थांना नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** मध्ये नमूद संस्थांना नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता **प्रपत्र-अ** मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील.
३. सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.
४. सदर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक राहील.

५. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

६. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

७. सदर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

८. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

९. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत . तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११. रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये या संस्थांमधील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमास फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता नसल्याने या संस्थांनी फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडून यांची ६ महिन्याच्या आत मान्यता घ्यावी.

१३. तसेच फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास या प्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहिल, अशा आशयाचे हमीपत्र रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थेने तंत्र शिक्षण संचालनालयास द्यावे.

१४. या संस्थेस विहित मुदतीत फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता न मिळाल्यास राज्य शासनाची मान्यता आपोआप रद्द होईल व सदर संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता प्रवेश देण्यात येणार नाहीत. याबाबतची जबाबदारी तंत्र शिक्षण संचालनालयाची राहिल.

१५. याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१६. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२५१५४४४०६८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2019.06.25 15:51:00 +05'30'

(अ.र.काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई /पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/ अमरावती (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाइन्ड काऊन्सिल्स् बिल्डिंग, कोटला रोड, एजवान-इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१०. निवड नस्ती/तांशि-५.

## शासन निर्णय क्र.मान्यता-2019(प्र.क्र.96/19)/तांशि-5, दि. 25 जून, 2019 सोबतचे

## प्रपत्र-अ

**List of New Diploma Pharmacy Institute [Approved by AICTE from A.Y. 2019-20]**

| Sr No | Institute Name | Institute Address | District | Name of Parent Organisation (Trust) | Organisation (Trust) Address | Program | Level | Name of Course | Intake Approved for 2018-19 | Intake Approved for 2019-20 (AICTE) | Intake Approved for 2019-20 (Govt.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KADAM COLLEGE OF PHARMACY | NEAR NMC COLONY, VAIJAPUR DIST. AURANGABAD (MAHARASHTRA),PIN-423701 | AURANGABAD | VAIBHAV SHIKSHAN PRASARAK MANDAL AURANGABAD | 211,R-26,RAIGAD NAGAR,N-9,CIDCO AURANGABAD | PHARMACY | DIPLOMA | PHARMACY | 0 | 60 | 60 |
| 2 | VASANT PHARMACY COLLEGE KAIJ | LATUR BEED ROAD KAIJ | BEED | SHRI CHHATRAPATI SHIVAJI SHIKSHAN SANSTHA | BEED | PHARMACY | DIPLOMA | PHARMACY | 0 | 60 | 60 |